राजारामपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं. ३९/२०१५ (गोविंद पानसरे हत्या प्रकरण) मधून उद्भवणा-या सर्व प्रकरणाचे काम पाहण्यासाठी सहाय्यक विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड. श्री. शिवाजीराव राणे यांना अदा करावयाच्या फी मध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०११६/प्र.क्र.२५/पोल-१०
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक ,मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

<u>**संदर्भ**</u> : १) शासन अधिसूचना, विधी व न्याय विभाग क्र. एसपीपी ०११६/यु.ओ.आर.१८/डी-१४, दिनांक ०४ मे, २०१७.
२) शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०११६/प्र.क्र.२५/पोल-१०, दिनांक ३०/८/२०१८

<u>**प्रस्तावना :**</u>

राजारामपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं. ३९/२०१५ (गोविंद पानसरे हत्या प्रकरण) मधून उद्भवणा-या सर्व न्यायालयीन प्रकरणी शासनाच्यावतीने कामकाज पाहण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या ॲड. श्री. हर्षद निंबाळकर, विशेष सरकारी अभियोक्ता यांना सहाय्य करण्यासाठी विधी व न्याय विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील अधिसूचनेद्वारे ॲड. श्री. शिवाजीराव राणे यांची सहाय्यक विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे व शासकीय दराने व्यावसायिक फी अदा करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. आता ॲड. श्री शिवाजीराव राणे यांना सुधारित दराने व्यावसायिक फी अदा करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

ॲड. श्री. शिवाजीराव राणे यांना राजारामपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं. ३९/२०१५ (गोविंद पानसरे हत्या प्रकरण) अनुषांगिक न्यायालयीन प्रकरणात प्रतिदिन परिणामकारक सुनावणीकरीता सुधारित दराने व्यावसायिक फी अदा करण्याच्या प्रस्तावास विधी व न्याय विभागाने तसेच वित्त विभागाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार ॲड. श्री. शिवाजीराव राणे यांना राजारामपुरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं. ३९/२०१५ अनुषांगिक (गोविंद पानसरे हत्या प्रकरण) या न्यायालयीन प्रकरणात प्रत्येक परिणामकारक सुनावणी करीता रुपये ३५,०००/- (रुपये पस्तीस हजार फक्त) इतके व्यावसायिक शुल्क अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी ॲड. शिवाजीराव राणे यांना अपरिणामकारक सुनावणी फी अथवा इतर कोणतेही फी/भत्ते अनुज्ञये असणार नाहीत. परिणामकरक सुनावणीचे दिवस संबंधित प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व या प्रकरणी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याबाबत संबंधित संवितरण अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

३. या बाबीकरीता येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २६४/१९/व्यय-७, दिनांक २५.०७.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२९१२५३३५८९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.08.29 13:00:50 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधी), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर.
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. कोषागार अधिकारी, कोल्हापुर.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. ॲड. श्री. शिवाजीराव राणे, यशोवर्धन, प्लॉट नं.१०३,तात्यासाहेब मोहीते कॉलनी, कळंबा रोड, कोल्हापूर.
८. विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (पोल-१०).